
फिओनाची लेस

लेखिका: **पॅट्रिशिया पॉलको**

अनुवाद: **सुजाता गोडबोले**







फिओनाची लेस

लेखिका: **पॅट्रिशिया पॉलको**

अनुवाद: **सुजाता गोडबोले**

मिक आणि ॲनी ह्यूज
आणि अग्निशामक दलांच्या सर्व शूर जवानांना
अर्पण



खूप वर्षांपूर्वी माझ्या वडिलांचे कुटुंब आयर्लंडमधील लिमेरिक जवळच्या एका गरीब खेड्यात राहत असे. गावातले सर्वजण एका कापड गिरणीत काम करत असत, पण लवकरच ती बंद होणार होती. गावातील बहुतेक लोक आपल्या भविष्याच्या काळजीत होते. पण ग्लेन केरी हे गाव हेच त्यांचे घर होते आणि त्यांना त्याखेरीज इतर काहीच माहित नव्हते.

फिओना नावाच्या माझ्या वडिलांच्या पणजीने त्यांना एकदा सांगितले होते की ती आणि तिची लहान बहीण ऍलिस दररोज त्यांचे वडील गिरणीतून घरी येण्याच्या वेळी घराच्या फाटकाजवळ त्यांच्या स्वागतासाठी उभ्या राहत असत.



फिओनाची आई ॲनी, ती करत असलेल्या चवदार सूपसाठी आणि निरनिराळ्या सुरेख पावासाठी प्रसिद्ध होती. ह्यूज यांच्या घरातील रोजचे जेवण म्हणजे देखील मेजवानीच असे. पण फिओना आणि ॲलिस यांच्यासाठी जेवणातील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांचे वडील मिक यांनी सांगितलेल्या रसभरीत गोष्टी ऐकणे!

“बाबा, तुम्ही आईला तुमच्याशी लग्न करायला कसे तयार केलेत ती गोष्ट सांगा ना,” फिओना हळूच म्हणाली.

“हो, बाबा, सांगा ना!” ॲलिसने आग्रह केला.

गोष्ट सांगायला सुरुवात करताना त्यांच्या वडिलांचे डोळे चमकू लागले. “आता तुम्ही यावर विश्वास ठेवा, नाहीतर ठेवू नका,” त्यांनी सुरुवात केली. दोन्ही मुली आणि त्यांची आई लक्ष देऊन ऐकू लागल्या.

“पूर्वी जेव्हा तुमची आई आणि मी लिमेरिकच्या कापडाच्या गिरणीत काम करायचो, तेव्हा दुपारी जेवायला जाताना मला वाटेत लेस तयार करणारा विभाग लागायचा.” बाबा थांबले. फिओना ॲलिसकडे पाहून हसली. ही गोष्ट त्यांनाही तोंडपाठ होती!

“तेव्हा तिथे मला जगातली एक सर्वात सुंदर मुलगी दिसली.”

“काहीतरीच काय... मिक, तेव्हा तर तुझी ब्लारनीच्या मुलीशी मैत्री होती.” त्यांची आई लाजत म्हणाली.







“मग तिथे काम करणाऱ्या सगळ्या मुलींना मी ती मुलगी कुठे राहते ते विचारले म्हणजे मला तिच्याकडे जाऊन तिच्याशी बोलता येईल. पण त्यांच्यापैकी कोणीच मला काही सांगेना. एक दिवस मी गिरणीतून बाहेर पडलो, तेव्हा मला रस्त्याच्या सुरुवातीला एक लहानशी लेस एका झुडपाला बांधलेली दिसली. समोर पाहिले तर मला अशीच लेस काही झाडांना, झुडपांना, कुंपणाना आणि दिव्याच्या खांबांनाही बांधलेली दिसली. मला तिची ही लेस सहज ओळखता येत होती. मग मी लेस दिसेल त्याप्रमाणे त्यामागोमाग निघालो आणि एका छोट्याशा सुंदर घराशी येऊन पोचलो. याहून पुढे आता कुठेच लेस दिसत नव्हती… म्हणून मला कळले की हेच तुमच्या आईचे घर असणार.”

फिओना आणि ॲलिस खुश होऊन हसू लागल्या.



“पंधरा दिवसातच मी तुमच्या आईशी मैत्री वाढवायला सुरुवात केली आणि लवकरच ती माझ्याशी लग्न करायला तयार झाली. इथेच सेंट टिमथी चर्च मध्ये आमचे लग्न झाले आणि नव्या नवरीला मी याच घरात घेऊन आलो. याच उंबऱ्यावरून उचलून तिला घरात घेऊन आलो,” बाबा ऐटीत हात पसरून म्हणाले.

“तुमचा दोघींचा जन्मही इथे, याच घरात झाला.” आई म्हणाली.

“कल्पना करा की लेसच्या मागावरून तुम्हाला आई मिळाली.” फिओना स्वप्नात असल्याप्रमाणे म्हणाली.



मग फिओना रोजच्याप्रमाणेच आपले दिवसभराचे कलाकुसरीचे काम वडिलांना दाखवण्यासाठी घेऊन आली. तिची आई तिला लेसच्या कामातील बारकावे शिकवत होती. लेस लावलेली एक उशी वडिलांना दाखवत फिओना अभिमानाने म्हणाली, "आज आईने मला खास तिला एकटीलाच येणारा एक नवा टाका शिकवला."

"फिओना, तुला माहित आहे ना, तुझी आई आमच्या लिमारिक गावातली सर्वात उत्तम लेस विणणारी कलाकार होती." आईकडे हसत बघून बाबा मुद्दाम म्हणाले.

"हो, पण मिक, माझ्या सांधेदुखी मुळे ते सर्वच थांबले," आई शांतपणे म्हणाली. तिने हसण्याच्या प्रयत्न केला, पण तिची सुजलेली दुखरी बोटे पाहून सर्वांनाच खूप वाईट वाटत असे.

"पण फिओना माझ्यापेक्षाही अधिक उत्तम लेस विणेल. ती जरा मोठी झाली की मी तिला लिमरिक मधील लेस बनवण्याच्या ठिकाणी नेणार आहे आणि ती त्यांची सर्वोत्तम कारागीर असेल!" आपल्या मुलीच्या लेसकडे बारकाईने पाहताना ॲनी अभिमानाने म्हणाली.

आयर्लन्डमधील परिस्थिती आता कठीण झाली होती आणि ग्लेन केरीमध्ये तर ती अधिकच वाईट होती. ऐकले होते त्याप्रमाणे कापडाची गिरणी बंद झाली होती. बरेच लोक बेरोजगार झाले आणि अनेक कुटुंबांना गाव सोडून कामधंदा शोधण्यासाठी दुसरीकडे जाणे भाग पडले.

“मिक, आपण कुठे जाऊया?” एक दिवस ॲनीने विचारले. ती फार अस्वस्थ होती.

एक दिवस शेजारच्या ओ’फ्लॉरिटी मावशी कुंपणापलीकडून ॲनीला म्हणाल्या,

“जॅकने आणि मी एका करारावर सही केली आहे. अमेरिकेला जाण्याच्या खर्चासाठी आम्हाला फक्त तेवढेच करावे लागले!” आपले धुणे वाळत घालता घालता तिने सांगितले.

“पण हा कसला करार आहे?” ॲनीने विचारले.

“एका श्रीमंत कुटुंबात काम करण्याचा. आम्ही त्यांच्याकडे घरकाम करणार आहोत.”

“म्हणजे तुम्ही त्यांचे घरगडी होणार?”

“अर्थातच, आणि जॅक बागकाम वगैरे करेल. हे श्रीमंत लोक आमचा बोटीने अमेरिकेला जाण्याचा खर्च करतील. प्रवासाचे पैसे वसूल होईपर्यंत त्यांच्याकडे काम करण्यासाठी आम्ही बांधील असू.” ओ’फ्लॉरिटी मावशींनी माहिती पुरवली.





त्यादिवशी संध्याकाळी ऍनीने मिकला हे सर्व सांगितले. रात्री उशिरापर्यंत ते दोघे याविषयी चर्चा करत होते. एका आठवड्यात अशाच एका कंपनीत जाऊन अमेरिकेतील शिकागोत राहणाऱ्या एका श्रीमंत कुटुंबासाठी काम करण्याच्या करारावर त्यांनी सह्या केल्या.

“शिकागो, अमेरिका!” फिओना आश्चर्याने म्हणाली. एकीकडे तिला खूप उल्हसित वाटत होते कारण तिने अमेरिकेबद्दल खूप काही ऐकले होते. पण आपले गाव सोडून जायचे म्हणून तिला वाईटही वाटत होते.

पुढचे काही आठवडे सर्वांसाठीच कठीण होते. काय बरोबर न्यायचे आणि काय नाही हे ठरवणे फारच कठीण होते.

निघण्यापूर्वीच्या शेवटच्या रात्री फिओना आणि ऍलिसने त्यांच्या छोट्या पऱ्यांच्यासाठी एका भांड्यात दूध घालून बाहेर ठेवले. त्या नेहमीच असे दूध ठेवत असत.

“फिओना, अमेरिकेत काम करणाऱ्या लोकांकडेही नोकर असतात म्हणे. रस्त्यावर सोन्याच्या विटा असतील आणि आपण एका छानशा घरात राहू. आपल्या या छोट्या पऱ्यांनाही आपण आपल्याबरोबर अमेरिकेला नेऊ शकलो तर... आपल्याला त्यांना घेऊन जाता येईल का गं?” ऍलिसने आपल्या बहिणीला विचारले.

“नाही, ऍलिस. आपल्या पऱ्यांना इथे ग्लेन केरी जवळच्या जंगलाच्या आजूबाजूलाच रहायला आवडत असणार. इथेच त्या आनंदात राहतात.” फिओनाने हळूच सांगितले.





दुसऱ्या दिवशी सकाळी फिओनाच्या आई-बाबांनी त्यांच्या सर्व जुन्या मित्रांचा निरोप घेतला. सर्वांच्याच डोळ्यात अश्रू होते. म्हाताऱ्या फिट्झेराल्डनी सर्व सामान घोडागाडीत चढवल्यावर सगळे गाडीत बसले.

घर सोडून निघाल्यावर घर आणि गाव दिसेनासे होईपर्यंत सर्वजण त्याकडेच पाहत होते. डोंगरावरून खाली उतरल्यावर त्यांचे लाडके गाव झाडांमागे दिसेनासे झाले. फिओना आणि ऍलिस कितीतरी वेळ रडत होत्या. आईला देखील रडू आवरत नव्हते. बाबा हरवल्यासारखे लांब कुठेतरी पाहत बसले होते.

ती रात्र आणि बराचसा दुसरा दिवस देखील प्रवासातच गेला. बेलफास्टला पोचल्यावर ते अमेरिकेला जाणाऱ्या बोटीत चढण्यासाठी थेट गोदीवरच गेले.



बोट निघाल्यावर ते त्यांच्या आवडत्या आयर्लंडच्या किनाऱ्याकडे तो दिसेनासा होईपर्यंत पाहत राहिले. ॲटलांटिक महासागर ओलांडायला बराच वेळ लागला आणि ते सर्वांसाठीच कठीण होते. बोटीवरच्या बहुतेक सर्वांना बोट लागली होती आणि ते त्यामुळे चांगलेच थकले होते. वेळ घालवण्यासाठी फिओना मात्र लेस विणत बसली होती. किती तरी वार लेस तिने विणली होती.

अखेर ते न्यूयॉर्क बंदराजवळ पोचले. जमिनीवर पाय ठेवण्याची ते अगदी वाटच पाहत होते.

पण बंदरात उतरल्यावर त्यांना जेमतेम सर्व कागदपत्रांचे काम पूर्ण करण्याइतकाच वेळ मिळाला कारण मग शिकोगाला जाणारी आगगाडी पकडण्यासाठी त्यांना आगगाडीच्या स्टेशनकडे घाईने जावे लागले.

आगगाडीत झोपण्याची काही सोय नव्हती. बसण्याच्या बाकावरच त्यांना आलटून पालटून विश्रांती घेण्याचा प्रयत्न करावा लागत होता.

“बोटीत निदान झोपण्यासाठी चांगली सोय तरी होती,” थकून भागून ॲनी म्हणाली.



दिवसामागून दिवस जात होते. फिओना लेस विणण्यात मग्न होती. हा प्रवास धकाधकीचा, उकाड्याचा आणि धुळीतून जाणारा होता. ते अनेक शहरांतून आणि गावातून जात होते. बऱ्याच वेळा वाटेत गाडी थांबली की ते चीज आणि ब्रेड विकत घेत होते.

अखेर एक दिवस वाहकाने जाहीर केले की आता शिकागो जवळ आले होते.


“आता पोचलो! अखेर पोचलो!” ॲलिस आनंदाने म्हणाली.

अनेक मैल पसरलेले गुरांचे गोठे पार करत आगगाडी अखेर थांबली. दूरवर त्यांना एका मोठ्या शहरातील उंच इमारती दिसत होत्या.

“मला वाटतं की ही गुरे बहुधा कत्तलखान्यात नेली जात असावीत. अमेरिकन लोक चांगले-चुंगले खातात. मला वाटतं की प्रत्येक जेवणात ते गोमांस खात असावेत!” बाबा म्हणाले.

“आई, बघ, शिकागो शेजारीच समुद्र दिसतोय! आपली बोट थेट इथेच का आली नाही कोण जाणे!” फिओना म्हणाली.

“मंडळी, तुम्हाला दिसते आहे ते मिशिगन सरोवर आहे. ते खरेच समुद्रासारखे मोठे दिसते, नाही का?” वाहकाने माहिती पुरवली.







शिकागोच्या थांब्यावर प्रवाशांना घरी नेण्यासाठी अनेक गाड्या घेऊन गाडीवान थांबलेले होते. त्यांच्या मालकाने त्यांची जिथे राहण्याची सोय केली होती त्या जागेचा पत्ता फिओनाच्या बाबांकडे होता.

गावातून जात असताना फिओनाचा आपल्या डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. प्रत्येक इमारत पहिल्यापेक्षा अधिक मोठी होती- आणि अशा इमारतींच्या अनेक रांगा होत्या. खरेदी केलेल्या वस्तू घेऊन छान कपडे घातलेले लोक ऐटीत रस्त्यातून फिरत होते.

“ते फ्रॉक बघ किती छान दिसताहेत.” ॲनी ने उसासा सोडला.

“नक्कीच आयर्लंड मधील उत्तम लेस वापरून केलेले असणार!” बाबांनी पुस्ती जोडली.

“आपण इथे राहणार आहोत का?” ॲलिस उत्साहित होत म्हणाली.

“आपली जागा डिकोनन रस्त्यावर आहे. ते जवळ आले आहे का?” बाबांनी गाडीवानाला विचारले.

गाडीवान हसला आणि म्हणाला, “नाही साहेब, अजून आपल्याला बरेच दूर जायचे आहे.”



ते जसजसे पुढे जात होते तसतसे ते शिकागोच्या मोठ्या इमारतींच्या आलिशान भागातून बाहेर पडत होते हे स्पष्ट दिसत होते. आता हातगाडीवरून सामान विकणाऱ्यांची रस्त्यात गर्दी होती. इथल्या इमारती आणि घरे जुनाट आणि मोडकळीला आलेली होती.

“हे पहा, आपण आलो १२० डिकोनन रस्ता, या पत्त्यावर,” गाडीवान म्हणाला. मग त्याने सामान खाली उतरवण्यास आणि मोडक्या जिन्यावरून ते वर नेण्यास मदत केली.

“अगं बाई, ॲनी आलीस का!” या होत्या ओ’फ्लॉरिटी, त्यांच्या ग्लेन केरीच्या शेजारीण! “आम्ही पण त्याच कुटुंबासाठी काम करतो. तुम्ही येणार आहात असं त्यांनी आम्हाला सांगितलं. मी तुमचं घर आवरून ठेवलं आहे आणि झोपायची व्यवस्थाही केली आहे.” त्या म्हणाल्या.

फिओना हळूच आईच्या कानात कुजबुजली, “आई, मला वाटतं की काही तरी गडबड झाली आहे. तू आणि बाबा जर श्रीमंत लोकांसाठी काम करणार असाल, तर त्यांनी आपल्याला या अशा जागी का रहायला ठेवलं असेल?”

ॲनी आणि मुली घराची साफसफाई करू लागल्या आणि बाबा सामान आणायला बाहेर गेले. घासून पुसून घर स्वच्छ केल्यावर आणि बरोबर आणलेल्या कलाकुसर केलेल्या चादरी आणि अभ्रे वगैरे जुन्या सामानावर घातल्यावर ते दोन खोल्यांचे घर राहण्याजोगे दिसू लागले. त्यांनी असे घर कधीच पाहिले नव्हते. भांडी घासण्याची जागा आणि स्वयंपाकघराची एक खोली होती. दुसऱ्या खोलीत तीन पलंग ठेवल्यावर खोली भरून गेली होती.

ॲनी आणि ओ’फ्लॉरिटी मावशी एकाच कुटुंबाच्या स्वयंपाकघरात कामाला होत्या. रोज कामाला जाण्यासाठी त्यांना तीनदा गाडी बदलून जावे लागत असे.

“मी आपल्या पहिल्या पगाराची फार वाट पाहत आहे. शाळा सुरु होण्यापूर्वी मुलींना नवे बूट घ्यावे लागतील,” फरशी घासता घासता ॲनी हळूच म्हणाली.



“पगार!” ओ’फ्लॉरिटी मावशी आश्चर्याने म्हणाल्या. “इथे काम करण्याचे पैसे मिळणार नाहीत हे तुला माहित नाही का? तुमचा इथे येण्याचा प्रवासखर्च त्यांनी केला आहे, तो वसूल होईपर्यंत तुमची इथली सगळी कमाई त्यांचीच असेल!”

“शिवाय आपण राहत असलेल्या मोडक्या घराचे ते भाडेही घेतात कारण ते देखील त्यांच्या मालकीचे आहे! आणि आपल्या गणवेशाचे देखील ते पैसे कापतात.” पर्ट हेगरटी नावाच्या कामाच्या एका बाईने आणखी माहिती पुरवली.

“पण मग आपण आपला खर्च कसा भागवायचा?” ॲनी पुटपुटली.

“तुम्हाला त्यासाठी दुसरे काम शोधून तिथे संध्याकाळी काम करावे लागेल. आम्ही सगळे तेच करतो, तुला माहित नाही का?”



त्यांचे हे म्हणणे खरेच होते. ऍनी आणि मिक दोघांनीही दुसरी कामे मिळवली. मिक एका कत्तलखान्यात काम करू लागला आणि ऍनीला एका हॉटेलमध्ये कपडे धुण्याचे काम मिळाले. थोड्याच दिवसात ओ'फ्लॉरिटी मावशींनी श्रीमंती कपडे बनवणाऱ्या शहरातल्या एका दुकानाबद्दल ऍनीला सांगितले. "ते आयरिश लेसच्या शोधात आहेत. आणि तुझी फिओना तर सर्वात उत्तम लेस विणते!" ओ'फ्लॉरिटी मावशी म्हणाल्या.

ऍनीने त्या दुकानाशी संपर्क साधला आणि ती फिओनाला तिची लेस दाखवायला त्यांच्या खरेदी विभागात घेऊन गेली.

अर्थातच, लेस पाहून ते फारच खुश झाले. फिओनाच्या लेससाठी त्यांनी चांगली किंमत देऊ केली.
"ती जेवढी लेस विणेल, ती सगळी आम्ही विकत घेऊ!"



घरी आल्यावर ॲनी आणि फिओनाने जेव्हा ही बातमी ॲलिस आणि बाबांना सांगितली, तेव्हा त्यांनी लगेच त्यानिमित्त एक पार्टी करायची ठरवली.

“आता आपल्याला पैसे वाचवता येतील आणि इथे अमेरिकेतच आपले स्वतःचे घर घेता येईल!” नाच करताना खोलीत गिरक्या घेत ॲनी म्हणाली.

“मला तर नेमकी जागा देखील माहित आहे. ज्याला मिशिगन सरोवर म्हणतात ते ओलांडून आपण पलीकडे जाऊ. आणि तिथे आपण जमीन विकत घेऊ...” बाबा खुशीत येऊन म्हणाले.

“आपले छानसे शेत असेल आणि कदाचित मेंढ्यादेखील...” ॲलिसने आपला विचार सांगितला.

“बाबा, आपण जिथे जाणार आहोत त्या जागेचं नाव काय आहे?” फिओनाने विचारले.

“मिशिगन!” आपला लोखंडी पावा घेता घेता बाबा म्हणाले.



त्या संध्याकाळी त्यांचे सगळे शेजारी एकत्र जमले आणि त्यांनी गाणी म्हणून नाच केला- काहींनी तर फिओनाची लेस हातात धरून नाच केला.

खोली भोवती गोल फिरताना ते म्हणत होते, “फिओनासाठी!”

“या मुलीने आणि तिच्या लेसने ह्यूज कुटुंबाला वाचवले!” ओ’फ्लॉरिटी मावशी म्हणाल्या.

“परमेश्वराची अशीच सगळ्यांवर कृपा राहू दे.” ॲनी हळूच कुजबुजली.

दुसऱ्या दिवशी चर्चमध्ये जाण्याची वेळ होईपर्यंत त्यांची मौजमजा चालू होती.

काही महिन्यांतच ह्यूज कुटुंबाने वाचवलेले पैसे स्वयंपाकघराच्या एका वरच्या कप्प्यात पत्र्याच्या डब्यात ठेवले होते. ऑक्टोबर महिना चालू होता. लवकरच हॅलोवीन चा सण येणार होता. एक दिवस कामावर जाण्यापूर्वी बाबांनी एक गोष्ट सांगितली. बाबा गोष्ट सांगायला खाली बसले.

“ही पुका म्हणजे भुतासारख्या एका काळ्या घोड्याची गोष्ट आहे, त्याच्यावर कोस्टा बॉवर म्हणजे मृत्यूच्या देवाचं खोगीर आहे. बानशी दारावर थाप आणि धक्के देऊन या जगातून गेलेल्या लोकांचे आत्मे गोळा करत असतो.” बाबा शहारे आणत म्हणाले.



“बाबा, मला ही गोष्ट नको. लेसचा माग काढत तुम्ही आईकडे कसे गेलात ती गोष्ट सांगा!” ॲलिसने हट्टच धरला.

“बाळ, पण तुला तर ती तोंडपाठ आहे!”

“मला पण तीच गोष्ट ऐकायची आहे बाबा. मला ग्लेन केरी बद्दल ऐकायचे आहे. मला आयर्लंड ची खूप आठवण येते.”

बाबांनी त्यांचा हट्ट पुरवला आणि मग आई-बाबांनी त्या दोघींना झोपायला सांगितले.

“लक्षात ठेवा, माझ्या कोकरांनो, धर्माने वागा, ईश्वरावर विश्वास ठेवा, तो आपल्या हृदयात राहतो, तुमच्यावर प्रेम करणाऱ्यांची तुम्ही जोपर्यंत आठवण ठेवाल तोपर्यंत तो तुमच्याजवळच राहील.” असं म्हणून ते दोघेही हळूच कामाला जाण्यासाठी दाराबाहेर पडले.

ॲलिसला लगेच झोप लागली पण फिओना मात्र कितीतरी वेळ लेस विणत बसली होती. तिने सहज मान वर करून खिडकीबाहेर पहिले, तर तिला बाहेर उजेड दिसला. आता तर खूपच रात्र झाली होती. हा कसला उजेड असेल?

बाहेर तिला लोकांच्या ओरडण्याचा आणि लोक पळत असल्याचा आवाज आला. मग त्यांच्या दारावर कोणीतरी धक्के देत होते.

“बानशी असेल... आपल्याला पकडायला येत असेल!” ॲलिस झोपेतून अचानक जागी होऊन किंचाळली.

मग कोणीतरी ओरडून सांगत असलेले त्यांना ऐकू आले, “आग!... आग लागली आहे... बाहेर पळा लवकर आणि जीव वाचवा!”

ते ऐकून फिओनाने ॲलिसचे कपडे बदलले, शाली अंगाभोवती गुंडाळल्या, पत्र्याचा डबा आणि तिने विणलेल्या लेसचा गठ्ठा उचलला आणि त्या दाराकडे पळाल्या. फिओनाने आपल्या रडणाऱ्या बहिणीला ओढतच बाहेर आणले.





सर्वजण मोडक्या जिन्यावरून कसेबसे खालच्या गल्लीत आले.

सगळीकडे लोक ओरडत सैरावैरा धावत होते. फिओनाने मागे वळून पहिले तर आकाशात झेपावणाऱ्या आगीच्या ज्वाळांशिवाय काहीच दिसत नव्हते. सगळीकडे अंधार आणि धूर पसरला होता. तेवढ्यात खिंकाळणारे घोडे, त्यांच्या टापांचा आवाज आणि घणघणणारी घंटा त्यांच्याजवळून गेल्याचा आवाज आला.

“हा पुका आणि कोस्टा बॉवरच असणार!” ऍलिस किंचाळली.

“नाही, ऍलिस, तो आगीचा बंब आहे. ते आग विझवण्यासाठी आले आहेत.”

फिओनाने आपल्या बहिणीला ओढता ओढता ओरडून सांगितले.

“आई-बाबा कुठे आहेत? ते आहेत तरी कुठे? आपले घर जर जळून गेले तर ते आपल्याला कुठे शोधतील?” ऍलिस हुंदके देत रडू लागली.

फिओनाने काहीच उत्तर दिले नाही. घशाला कोरड पडेपर्यंत त्या पळतच राहिल्या.

“पण फिओना, आपण कुठे चाललो आहोत?” ॲलिसने धापा टाकत विचारले.

“आपण आपल्या घरापासून दूर चाललो आहोत. त्याला अगोदरच आग लागली आहे आणि आता परत काही तिथे जाता येणार नाही.” फिओना घाईघाईत म्हणाली.


“पण आई-बाबा आपल्याला कसे काय शोधतील?” ॲलिसने हुंदके देत देत विचारले.

फिओनाने तिचा लेसचा गठ्ठा बाहेर काढला. कात्री तर अजूनही तिच्या गळ्याभोवतीच होती. तिने लेसचे तुकडे कापायला सुरुवात केली.

“नाही, नको फिओना, तुझी इतकी सुंदर लेस...!” ॲलिस घाबरून किंचाळायला लागली.

“ॲलिस, एवढा एकच मार्ग आहे. आपण माझ्या लेसचा माग सोडूया. म्हणजे आई-बाबांना आपण कुठे आहोत ते समजेल.” आपल्या लहान बहिणीला शांत करण्याच्या प्रयत्नात फिओनाने तिला समजावले.





फिओनाने तिच्या लेसचा शेवटचा तुकडा एका तळघराच्या दाराला बांधला आणि त्या दोघी तळघरात गेल्या.

रात्रीच्या अंधारात अनेक तास त्या दोघी एकमेकींना घट्ट धरून बसून राहिल्या.

मधून मधून फिओनाला कुणाचे तरी आवाज येत असल्याचा भास व्हायचा, पण मग ते आवाज अस्पष्ट होत नाहीसे होत. सकाळ झाल्यावर ॲलिस परत रडू लागली.

"आई-बाबांना आपण आतापर्यंत सापडायला हव्या होतो... ते अजून आले नाहीत!" ती हुंदके देत म्हणू लागली.

"आपल्या लेसमुळे ते नक्की आपल्यापर्यंत पोचतील. ॲलिस माझी खात्री आहे. ते नक्की येतील." फिओनाने तिची समजूत घालण्याचा प्रयत्न केला.

"या भयानक आगीत जर त्यांना काही झाले असेल तर? शिकागोत आता काहीच शिल्लक राहिले नाही. अगदी काही नाही." आणि ॲलिस आणखीच हुंदके देऊन रडू लागली.

आणि त्याच क्षणी त्यांना एक ओळखीचा आवाज ऐकू आला...

"माझी कोकरे! माझी छोटीशी गोड गोड कोकरे!"

ती त्यांची आईच होती. आई आणि बाबांनी धुराने काळवंडलेले लेसचे तुकडे घट्ट पकडून ठेवले होते.

“आम्ही किती तरी तास तुम्हाला शोधत होतो. निराशेने आम्हाला घेरले होते.” मुलींना मिठी मारून आई म्हणाली.

“आणि तेवढ्यात आम्हाला अचानक - आशेचा एक पहिला लहानसा किरण दिसला. फिओना तुझी लेस- दिव्याच्या एका खांबाला बांधलेली तुझी लेस दिसली.” बाबा म्हणाले.

“मग आम्ही तिचा माग घेत राहिलो. आम्ही लेसच्या प्रत्येक तुकड्यामागे गेलो,” आईने सांगितले.



“आणि मग आम्ही आमच्या लाडक्या लेकींपर्यंत पोचलो... अगदी इथपर्यंत!” असं म्हणताना बाबांच्या डोळ्यातले अश्रू त्यांच्या गालावरून ओघळत होते.

“पण आई, फिओनाची सगळी लेस खराब झाली. ती धुराने आणि मातीने मळून गेली आहे.” ॲलिस आईच्या कानात म्हणाली.

“नाही बाळा, ही तिची सर्वात सुंदर लेस आहे - धूर आणि मातीने मळलेली - कारण त्या लेसनेच तुम्हाला दोघींना, आणि आम्हाला पण, वाचवले आहे.” आईला रडू आवरेना. तिने दोघींना पोटाशी धरले.

“फिओना, आपण आणि आपल्या नंतरच्या अनेक पिढ्या ही मूल्यवान लेस प्रेमाने जपून ठेवतील. कायमच!” बाबा म्हणाले.



मिक ह्यूज यांचे म्हणणे खरे ठरले. माझ्या वडिलांच्या कुटुंबाने खरोखरच अनेक पिढ्या फिओनाची ही लेस जपून ठेवली आहे. माझ्या वडिलांच्या कुटुंबातील नव्या नवऱ्या त्यांच्या विवाहाच्या पोशाखात, किंवा हातातील फुलांच्या गुच्छात, नाही तर त्यांच्या कपड्यात अगदी हृदयाच्या जवळ या लेसचा एखादा तुकडा आवर्जून लावतात.

माझ्या घरात मी फिओनाच्या लेसचा एक तुकडा फ्रेम करून सहज लक्ष जाईल अशा महत्त्वाच्या जागी लावला आहे. तो पाहून मला खूप दिलासा मिळतो. कारण प्रत्येक वेळी मी तिथून गेले किंवा माझी नजर त्याच्यावर पडली की मला माझ्या वडिलांची, त्यांच्या आईची, माझ्या काका, आणि आत्याची...

लहानशा जादूच्या लोकांची, आणि आयर्लंडच्या संस्कृतीची आठवण येते...

मग माझ्या मनात परमेश्वराचा विचार येतो, आणि ॲनीने तिच्या दोन मुलींना दिलेल्या शिकवणुकीची आठवण होते, की जिथे आपले मन असते तेच आपले घर, आणि जोपर्यंत आपल्याला आपल्या लोकांची आठवण असते, तोपर्यंत ते घर कायम राहते.

धन्यवाद, फिओना. तू दिलेल्या आश्चर्यकारक वारशाबद्दल, आणि त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे तुझ्या अमूल्य लेसबद्दल.